# प्रभु तरुण

| वर्ष ५६ | अंक ०७ | मुंबई | १६ मार्च, २०२३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## यशस्वी भव!

—सुहासिनी कीर्तिकर

सध्या चालू असलेल्या सदरांत कुणी आठवणींच्या हिंदोळ्यावर झुलतोय, कुणी साठवणीतल्या आठवणी उपसून त्यात रमतोय. हे रमणे म्हणजे स्मरणसोहळाच. असा सोहळा प्रत्येकजणच साजरा करीत असतो. हे दिवस परीक्षांचे आहेत. मग मलाही अभ्यासावर आधारित बाळकरामांचा (म्हणजे राम गणेश गडकरी यांचा) 'सकाळचा अभ्यास' हा धडा आठवला. अभ्यास तर करावाच लागतो. त्यातून कुणाला सुटता आलेय? मग ही अभ्यासाला बसलेली मुले लक्ष दुसरीकडेच असताना केवळ घोकंपट्टी करताहेत. त्यातून होणारे इकडचे तिकडे अन् तिकडचे इकडे वाचकांना 'इकडम्‌तिकडम्'चा हास्यानुभव देते. मग कधीतरी त्यातला वात्रट मुलगा घड्याळाच्या काट्यांना हुशारीने पुढे सरकवतो अन् संपतो एकदाचा अभ्यास. आठवतच असेल माझ्या पिढीतल्या मंडळींना हे सगळे. पण शाळांचे दिवस रम्यच होते अन् अभ्यासही. कारण घरी आले की दिलेला अभ्यास करायचा आणि पळायचे खेळायला. लगोरी, लपंडाव, आबादुबी, भोवरा, झाडावरचा डाव, पकडापकडी... कितीतरी खेळ आणि खेळणारी मुले अगदी वाट बघत असायची. रेडियोवर कामगारसभा सुरू झाली की मुले 'पाखरे बघ गेली कोटरी' म्हणत परत आपापल्या घरी. मग हातपाय धुवून सगळ्या मुलांचे एकसाथ सुरू व्हायचे - 'शुभं करोति, भीमरूपी महारुद्रा, रामरक्षा, मनाचे श्लोक...' त्यानंतर उजळणी अगदी दीडकीपर्यंत, आऊटकीपर्यंत. क्लासेसचे पेव नव्हते फुटलेले. ट्यूशन्सचा आसूड नव्हता मागे. मोठ्या वर्गात गेले की आवडनिवड बदलायची. पण शाळा संपून कॉलेज सुरू झाले तरी मनावर, घरात, दारात कुठेही तणाव नसायचा कसलाच. 'की बाबा, आता कोणती शाखा? आता आणखी कुठले कोर्सेस? माध्यम बदलले तर आता कोणता क्लास लावायचा?' छे! छे! असले काहीच नाही. परीक्षेत क्लास कोणता मिळाला? हा प्रश्न विचारला जाई. पण टक्के किती; ते कुणीच विचारीत नसे. पंच्याहत्तर टक्क्यांच्या वर म्हणजे 'डिस्टिंक्शन'! 'व्वा! काय हुश्शार!' - अशी प्रतिक्रिया असायची. आईबाबा किंवा घरातली वडीलधारी मंडळीच मुलाने कोणते शिक्षण घ्यायचे, काय करायचे ते बहुधा ठरवीत. म्हणजे ते आधीच्या पिढीच्या अनुभवांवर आधारित अनुशासन पर्व होते म्हणा ना. पण हुकूमशाही नसायची. शिकणाऱ्याचे भले व्हावे हा विचार ह्यात असायचा. आधीची पिढी, शिक्षक-प्राध्यापक वंदनीय असायचे.

मग काळ पुढे सरकला. जगण्यातले निवांतपण अनेक कारणांनी संपले. आर्टस्, सायन्स, कॉमर्स आदी ठळक शाखांना वेगवेगळ्या फांद्या फुटल्या. विविध पदविका तारणहार ठरू लागल्या. आधीच्या पिढीतील शिक्षकांबद्दलचा आदर 'अरे, अगं' वर आला. शिक्षकांचे नोकरदार झाले. घरातील वडीलधारी एका कोपऱ्यात गेली. अगदी हुश्शार मुलेही मार्कांच्या शर्यतीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी क्लासेस लावू लागली. मैदानी खेळ आणि मोकळी जागाही संपुष्टात आली. घरातील मुलांची संख्या आटली आणि वरिष्ठ पिढीही दुर्लक्षित ठरू लागली. ज्ञानापेक्षा चांगल्या रहाणीमानाचे वेध लागले. स्पर्धा सुरू झाली. मग अनुशासन पर्व जणू संपले आणि दोन पिढ्यांचे चर्चासत्र सुरू झाले. या चर्चेत मोठ्यांचा सल्ला घेतला जायचा; पण विद्यार्थ्याला काय हवे ते त्याचे तो ठरवू लागला. जीवनमान सुधारणे हीच अंतीम धारणा! हे सुधारले की त्याचा 'चार आकडी' पगार मोठ्ठी 'इन्कमस्लॅब' ठरू लागला. मन रिझवण्याची साधने वाढली. बैठे खेळ किंवा घरबशी वृत्तीच या पिढीने पसंत केली. हे विचारविनिमय पर्व म्हणायला हवे.

पण पुढे विचारही राहिला नाही आणि विनिमयाला गरात वडिलधारे माणूसही राहिले नाही. अगदी आईवडीलही वेगाला बांधले गेले. घरात लहान पिढी म्हणजे आधी 'हमारे दो' अन् मग एकच. घरात सोयी भरपूर, जागा भरपूर. शेजारी कोण आहे; याची माहिती नाही. तंत्रज्ञान तर शर्यतीत पळावे तसे फारफार पुढे पळत राहिले. जग हेच एक मोठे घर झाले. या जागतिकीकरणात जगायचे तर 'पळा, पळा; कोण पुढे पळतो' हीच जीवघेणी शर्यत. मग अनुशासन, विचारविनिमयपर्वाची चर्चा कशासाठी?' पैसे दे दो, सुविधा ले लो!'. अभ्यासाच्या एकेका विषयासाठी स्वतंत्र क्लास, ट्यूशन्स. एवढंच काय; पण उच्चारांसाठी क्लास, चितारण्यासाठी क्लास, योगासाठी क्लास, नाचासाठी क्लास, पोहोण्यासाठी क्लास, बॅडमिंटन - क्रिकेटसाठी क्लास, हस्तकलेसाठी क्लास, कॉम्प्युटर क्लास, संभाषणक्लास, धावण्यासाठी क्लास, कुकिंग क्लास, संगीतक्लास असे करीत विद्यार्थी 'क्लासिक' होत गेला! रेडियो मागे पडला अन् टिव्ही, कॉम्प्युटर, मोबाईल.... धरबंद नसलेल्या सोयी विद्यार्थ्यांचे सहचर बनले. त्यात ते काय पहाताहेत, काय संवाद करताहेत.... मोठ्यांशी घरातच संवाद नसल्याने... संवादापलिकडे गेले. एकेका, अर्ध्या अर्ध्या मार्कासाठी जीव खाऊन भागदौड सुरू झाली. अगदी सत्त्याण्णव टक्के मिळाले तरी घरातला मुलगा/मुलगी चिमणीएवढे तोंड घेऊन उदास राहू लागली अन् त्यांचे पालक! 'एवढा पैसा ओतला तरी काय हे चिरपूट गुण?' म्हणून त्यात भर टाकू लागली. महाजाळात अडकलेले आजचे पालक अन् मुले मग आणखी तशीच पळत परदेशी जाऊ लागली. तंत्रज्ञ असली तरी सुखापासून दूर दूर जाऊ लागली. मग वेगळ्याच वाटेने सुखाचा शोध घेऊ लागली. सुख उत्तानपणात आहे, झिंग आणण्यात आहे, लैंगिक अनाचारात आहे, विविध सोयींची घरात रेलचेल करण्यात आहे, भावना दडपून फक्त कर्तव्य पार पाडण्यात आहे, संवादरहित जगण्यात आहे... हे त्यांनी मानले किंवा यंत्र-तंत्रसमृद्धीच्या काळात आपोआप घडत गेले.

संध्याकाळ घरात सगळ्यांनी एकत्र बसून परवचा, प्रार्थना म्हणण्यात घालवणे संपलेच. आता संध्याकाळ घरात उगवतच नाही. दिवस मोठ्ठा होत रात्रीत वाढतो. सकाळ आळसलेली असते. 'स्वयं'पाक नसतो; त्यासाठी 'कुक' असते. मित्रमैत्रिणी भेटून गप्पा रंगत नाहीत; पार्ट्या रंगतात. तरीही; तरीही मित्रांनो; या सगळ्यांपासून थोडे अलिप्त आपण असतोच. परीक्षा आत्मभान राखून देतोच. चांगले वाचन करतोच. आभासी जगात असतानाही स्वत्व राखतोच. कारण आपण परभू आहोत. एकमेकांना भेटण्यात, गरजूंना मदत करण्यात, सण साजरे करण्यात, सणासुदीनिमित्ताने परभी खाणे आणि रिती पाळण्यात... आनंदी असण्यात आपण आजही आदर्श आहोत.

या आदर्शाचा भाग म्हणून आपण आजही कुटुंबाला धरून आहोत. आता परीक्षांचा मोसम आहे. तुम्हा सर्वांच्या कुटुंबाचा भाग बनून मी सर्व विद्यार्थ्यांना मनापासून शुभेच्छा देते.

'यशस्वी भव!'

‘हर्ष’

# रंग आहे सावळा

-हेमंत विनायकराव तळपदे

असं म्हणतात की आपले जीवन हे निरनिराळ्या रंगानीच भरलेले आहे. हे रंग नसतील तर आपले जीवन नीरस होईल. या रंगांची प्रत्येक मानवाला इतकी सवय जडली आहे की तो केवळ पांढरा अथवा केवळ काळ्या रंगाची अपेक्षा करूच शकत नाही.

तसे पाहता आपल्या सौभाग्यवतींच्या कुंकवाचा रंग लालच असतो. आजकाल भारतीय सिनेमांच्या प्रभावामुळे चित्रपटातील सौभाग्यवती सून लहानशी टिकली लावते. ती टिकली कधीकधी काळ्या रंगाचीही असते. पण आपल्या घरातील गृहिणी गडद लाल रंगाचेच कुंकु लावते. लाल रंग हा भाग्याचा मानला जातो. स्त्रीच्या कपाळावर गडद लाल रंगाचे कुंकू जेव्हा अवतरते तेव्हा तिचा पती तिच्याकडे जास्त आकर्षित होतो असे मानतात. हे कुंकू ही सुहासिनी पतीच्या वियोगापर्यंत भाळी मिरवते. आजकाल तर पती वियोगानंतरही भारतीय स्त्रिया हे कुंकू कपाळावर नियमितपणे लावतात व त्यात काही वावगे आहे असे आपण मानतही नाही. हा लाल रंग आपल्या पूजेच्या वेळीही आपण वापरतो. इतकेच काय; एखाद्याला जास्त राग आला तर तो शत्रूपक्षाचे कानफट लालेलाल करतो. आपल्या शरीरातील रक्ताचा रंगही लालच आहे. तो जर हिरवा पिवळा होऊ लागला तर फारच गडबड होते.

तसा दुसरा महत्त्वाचा रंग म्हणजे केसरी अथवा भगवा. हा रंग आपल्या धर्माचे प्रतीक आहे. भागवत धर्माची पताका भगवी. आपल्या पूजनीय शिवछत्रपतींनी त्यांच्या ध्वजाचा रंग भगवा निवडला. आदरणीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांनीही आपल्या सेनेचा ध्वज भगवामय केला. शिवरायांनी तर या भगव्या ध्वजाखाली अठरापगड जाती जमातीच्या मावळ्यांना एकत्र केले व मराठी राज्याची मोट बांधली. आजही आपण लग्नसमारंभात भगवे फेटे परिधान करतो व मानाने मिरवतो.

तर मंडळी तिसरा पावित्र्याचे प्रतिक असलेला रंग म्हणजे हिरवा. हा रंग खास करून आपल्या पृथ्वीच्या सुजलाम सुफलाम तत्त्वाची प्रचिती देतो. सर्व बागायती, मळे हिरवे, शेते हिरवी, डोंगर, दऱ्या, टेकड्या हिरव्या. इतकेच काय तर लग्नाच्या वेळी सुवासिनींची साडी चोळी देखील हिरवीच असते. आपल्या कुलदेवतेची ओटी आपण हिरव्या खणानीच भरतो. हा हिरवा रंग आपल्या राष्ट्रध्वजातही मिरवतो. अनेक कवींनी त्यांच्या कवितांमध्ये ‘हिरवे हिरवे गार गालिचे’ असे वर्णन करताना या हिरव्या रंगांची महानता अधोरेखीत केली आहे. गाडीने अथवा स्कूटरने प्रवास करतेवेळी हा हिरवा रंग दिसला की वाहने प्रस्थान करतात. हिरवा पोपट, हिरवे पेरु, हिरवीगार भाजी आपल्याला नेहमीच प्रिय असते. बागेतल्या हिरवळीवर अंग झोकून पहुडल्यावर निळ्याभोर आकाशाचे अवलोकन करताना जो आनंद मनाला मिळतो तो येथे लिहून व्यक्त होऊ शकत नाही.

आता त्यातल्या त्यात सभ्य रंग म्हणजे पांढरा. हा रंग सभ्यतेचे आणि शांतीचे खास प्रतीक म्हणावे लागेल. युद्धात एखादी सेना शरणागती पत्करून तह करण्यासाठी सरसावत असे तेव्हा सर्वप्रथम पांढरे निशाण पक्षाला तिला दाखवावे लागते. आपल्या ध्वजातही हा रंग अगदी मधोमध मानाचे स्थान बाळगून आहे. देशात संपूर्ण शांती नांदो या उद्देशाने या रंगाची निवड झाली असावी असे वाटते. चित्रकलेमध्ये तर या पांढ्या रंगाचे फारच महत्त्व आहे. पांढ्या कॅनव्हासवर एखादा चित्रकार जेव्हा इतर रंगांचे फटकारे ओढतो तेव्हा प्रत्येक रंगाचा फटकारा एका वेगळ्या कंगोऱ्यातून आपल्याला आकर्षित करतो. पण हा रंग तसा मिस्कीलही आहे. एखाद्याची घोडचूक स्वत:ला उमजली की त्याचा चेहरा पांढरा फटफटीत पडतो. आकाशात पांढरे ढग अवतरले तर आपण आकाश निरभ्र आहे असे म्हणतो. इतकेच काय; मी हा लघुलेख एका पांढ्या कागदावरच लिहीत आहे. असो.

तसा आणखी रंग महत्त्वाचा रंग म्हणजे निळा. आकाश निळे. त्याचे प्रतिबिंब ज्या डोहात उतरते तो डोह निळा. बंगालच्या उपसागराचे पाणी निळे. बालकवींचा निर्झर निळासावळा. शंभूदेवाचा कंठ निळा इतकेच काय आपल्या भीमसैनिकांच्या ध्वजाचा रंगही निळा. हा रंग अधिक गडदही नाही वा अधिक फिकटही नाही. या रंगाला स्वत:चे महत्त्व आहे. निळ्या डोळ्यांची मनीमाऊ अथवा निळ्या डोळ्यांची छकुली जेव्हा आपल्यासमोर अचानक येते तेव्हा या मनाला एक वेगळाच आनंद मिळतो.

आणि एक त्यातल्या त्यात सभ्य रंग म्हणजे पिवळा. या पिवळ्यातही अनेक चढउतार आहेत. फिकट पिवळा, मध्यम पिवळा अथवा गडद पिवळा. आपली लिंबे ही गडद पिवळी असतात तर पिकलेला पेरु पिकट पिवळा असतो. एखाद्याला कावीळ झाली की त्याचे डोळे पिवळसर दिसतात. चित्रपटातील नायिका जेव्हा पिवळी साडी घालते तेव्हा अनेक युवती तिचे अनुकरण करतात. ‘मैने प्यार किया’ या बडजात्यांच्या चित्रपटात नायिका भाग्यश्री पिवळी साडी घालून ‘दिल दिवाना बिन सजनाके मानेना’ या गाण्यावर नाचते तेव्हा तिचे सौंदर्य खानदानी दिसते. हा पिवळा रंग जेव्हा ट्रॅफिक सिग्नलमध्ये सुरू होतो तेव्हा गतीशील वाहने गती कमी करतात तर अचल वहाने आपले चलन सुरू करतात.

आणखी एक खतरनाक रंग म्हणजे काळा. हा फिकट, मध्यम वा गडद असला तरी शेवटी तो काळाच असतो. पण तसे पाहता याचेही पावित्र्य काही कमी नाही. आपल्या पूजेच्या तबकातील अबीर काळा, विठूराया काळे, शंकराच्या पिंडीतील शाळीग्राम काळा. इतकेच काय तर एखाद्याला पोलीसांनी चांगलेच बदडले तर शरीरावर चट्टे काळेच पडतात. एखादी निराशा पदरी आली तर आपला चेहरा काळवंडतो. आपल्या महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर असलेला सह्याद्री काळा. इतकेच काय तर दुकानांवरच्या अनेक फलकांची नावे या काळ्या रंगात रुबाबदारपणे चमकतात. आपली प्रत्येक रात्र काळीकुट्ट असते.

तर मंडळी इतका उहापोह करण्याचे कारण म्हणजे या रंगांची सरमिसळ आपल्याला एक अनोखा आनंद देत असते नाही; का? इंद्रधनुष्यातले सातही रंग जेव्हा गरगर फिरतात तेव्हा आपल्याला पांढरा रंगच दिसतो.पण या सात रंगांचे महत्त्व त्यामुळे कमी होत नाही. या रंगाची अपरुपे गुलाबी, जांभळा, किरमिजी इत्यादी दिसतात. हे रंग खरोखरच देवाची देणगी आहेत. या रंगांचा वापर करून आपण आपले जीवन बहारदार करू शकतो. पण त्यासाठी आपल्या अंतर्मनात एक चित्रकार जागरूक रहायला हवा. या रंगांसारखेच आपणा सर्वांचे जीवन रंगमयी होवो इतकीच प्रार्थना

मो. ९८२१६०७५९३

**Statement about ownership and other particulars about news paper**

**PRABHU TARUN**

**Form IV (See Rule 8)**

**To be published in the first issue after the last day of February**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Place of Publication | : | B3 Parijat, Patel Estate, Jogeshwari, Mumbai-400 102. |
| 2) | Periodicity of Publication | : | Monthly |
| 3) | Printers Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| 4) | Address | : | Same as above |
| | Editors Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| | Nationality | : | Indian |
| 5) | Address | : | Same as above |
| 6) | Name & Addres of Individuals who own the News Paper and Partners of Sharehold holding more than one Percent of Capital. | : | Board of Trustees Prabhu Tarun |

I Smt. Suhasini Kirtikar hereby declare that particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**16-03-2023** **Suhasini Kirtikar**

Mumbai Signature of Publisher

## अभिनंदन

**श्री. शीतल तळपदे यांना कलासारथी पुरस्कार प्राप्त झाला. त्याचा तपशील**

## THE ART OF LIVING

Respected Sheetal Talpadeji,

In its 7500 year history, Indian Performing Arts has seen a changing yet always relevant impact in society. While on one hand art is a medium of spiritual communication and communion, on the other hand, it is also a medium of education and entertainment. Art and Artists have the ability to make society think and bring about changes. Art can make one erupt in thunderous applause as well as bring about a smile of contentment on the rasikas face.

The World Forum for Art & Culture (WFAC) would like to confer upon you the title of "KALA SARATHI-A charioteer of the Arts" for your remarkable contribution to sustaining, nurturing, and preserving Indian performing arts on 26 Jan 2023 in the presence of Gurudev Sri Sri Ravi Shankarji as part of the 3-day Festival of Art & Culture BHAAV - THE EXPRESSIONS SUMMIT at the Art of Living International Centre, Bengaluru. WFAC would also be very happy to feature you as a Guest of Honour in the inaugural ceremony on 26 Jan. We also invite you to attend and exclusive knowledge session and interaction with Gurudev on 28 Jan.

It would be our pleasure to host you in our serene Ashram from 26-28 January 2023. We request you to confirm your acceptance of the Kala Sarathi title by 25 December 2022.

Thank you.

Jai Guru Dev
Warm Regards,
Srividya Varchaswi
Director, WFAC
The Art of Living

**प्रतिक्रिया**

Dear Anaya,

Just now I read the beautiful story you have written in 'Prabhu Tarun'. I can't believe that a small kid like you can write such a picturesque story. I wish that you also become a great explorer like your Sitara and travel to many beautiful untouched places.

With lots of blessings,

**- Dr. Suman Navalkar**

आठवणींच्या साठवणीतून

## बूँदसे गयी वह...

-डॉ. सुमन नवलकर

३)

गुलमर्ग नेहमीप्रमाणेच बर्फच्छादित होता. टूरवाल्यांनी आमची बस डोंगराच्या पायथ्याशी उभी केली आणि म्हटलं, वर पायीच चढून जायचंय या पाऊलवाटेने. येताना स्लेजमधे बसून या. वा! चक्क चित्रपटात दाखवतात तसं स्लेजमधून यायचं. शिवाय, जिथे जाऊ तिथे तिथली जी काही मौज-मजा असेल ती अनुभवायचीच असं माझं नेहमीच ठरलेलं असायचं. परत- परत त्याच-त्याच ठिकाणी जायला मला कधीच आवडत नसायचं. त्यामुळे आपण स्लेजची मजा आज अनुभवायचीच, हे मनाशी ठरलेलंच होतं. पण आम्ही वर पोहोचलो आणि भुरू- भुरू बर्फच पडायला लागला. तापमान त्यामुळे आणखीच खाली आलं. आधीच कुडकुडणारे आम्ही त्यामुळे अधिकच कुडकुडायला लागलो. टूरमधले बाकी प्रवासी पटापट स्लेजमधे बसून खाली येत होते. पण आम्हाला चढायलाच वेळ लागल्यामुळे आम्ही तसेही शेवटच्याच क्रमांकावर होतो. चार वर्षांचं मूल बरोबर. आळी-पाळीने त्याला कडेवर घेत, मधेच थोडं चालवायचा प्रयत्न करत वरपर्यंत पोहोचलो. स्लेजसाठी माणसं रांगेत उभी होती. पण तोपर्यंत आमचं बाळ इतकं गारठलं, की थरथर कापायलाच लागलं. डोळे लाल, नाक लाल, कानांच्या पाळ्या लाल. शेवटी तर रडूही यायला लागलं त्याला. मग 'चल-चल लवकर. हा बघ थरथरतोय.' तू म्हणालास. खरंच बाळ कुडकुडत होतं. मला दिसत होतं. पण प्रसंगाचं गांभीर्य काही लक्षात आलं नाही माझ्या. गारठून भलतं काहीही होऊ शकतं हेही माहीत नव्हतं किंवा गारठ्याने 'ती' पातळी अजून गाठलेली नाही, अशी भ्रामक समजूत माझी मीच करून घेतली होती. तेवढ्यात स्लेजवर बसायचा माझा नंबर अगदी जवळ आला होता. मी म्हटलं, 'स्लेजवर बसायचंय ना रे? चल, आपण स्लेजवरूनच जाऊ. घसरत-घसरत लवकर पोहोचू, उतरून जाण्यापेक्षा.'

बर्फवृष्टीने जोर पकडला होता. बाळ आणखी- आणखीच गारठत होतं. शेवटी तू मला आणि माझ्या स्लेजच्या वेडाला तिथेच सोडून, बाळाला आपल्या हातांमधे घट्ट कवटाळून झपाझप उतरणीला लागलास. यथावकाश पुढच्या दोघांनंतर माझा नंबर लागलाच. स्लेजवर मला बसवून तिथला कोणी काश्मिरी मला बर्फावरून घसरत-घसरत अलगद खाली घेऊन आला. माझं स्लेजचं स्वप्न पूर्ण झालं होतं. आता मला तेवढ्यासाठी पुन्हा काश्मिरला जायची गरज नव्हती. स्लेजवरून उतरून मी तुम्हा दोघांना शोधलं. तिथल्या स्थानिक ढाब्यावर विस्तवाच्या उबेला बाळाला घट्ट कवटाळून तू उभा होतास. डोळे तर तुझेही लालबुंद झाले होते. पण थंडीमुळे नव्हे, तर माझ्यावरच्या रागामुळे. आपलं चार वर्षांचं चिमुकलं, नाजुकसं मूल थंडीने काकडलंय आणि हिला स्लेजवरून घसरायचं पडलंय. आता ते घसरून बिसरून झाल्यावर आता हिला आपल्या नवऱ्याची आठवण झालीय.

एरव्ही आईला चिकटून असणारं बाळही आज बाबाला चिकटलं होतं. बाबाच्या उबेत त्याच्या स्वेटरमधे गाल खुपसून त्याने माझ्याकडे पाठ फिरवली होती. 'बाबाचे हात दुखले असतील. ये आता माझ्याकडे.' मी हात पुढे केले. पण त्याने माझ्याकडे ढुंकूनही पाहिलं नाही. आता तो पूर्णपणे त्याच्या बाबाचा झाला होता.

अजूनही प्रसंगाचं गांभीर्य माझ्यात पुरेसं झिरपलं नव्हतं. ''सुळ- सुळ- सुळ- सुळ बर्फावरून घसरत स्लेजगाडी किती वेगाने खाली येते रे. आपल्याला गाडीवरून उतरवून स्लेजवाले पुन्हा स्लेज घेऊन झपाझप डोंगर चढून जातात. पुन्हा नव्या पर्यटकाला आपल्या स्लेजवर बसवतात. पुन्हा घसरत खाली. वरून सतत बर्फ पडत असतानाही त्यांच्या या कष्टाच्या दिनक्रमात जराही फरक पडत नाही. कसं बघ! हे स्लेजवाले याच बर्फाळ प्रदेशात जन्माला येतात. इथेच लहानाचे मोठे होतात आणि बर्फ पडत असतानाही हे कष्ट उपसतच राहातात.'' मी वर्णन करून सांगत होते.

शेवटी म्हणालास, ''बस आता ते स्लेजपुराण. आलीस ना जाऊन? झालं ना तुझं समाधान? आता चल लवकर बसमधे. हॉटेलवर जाऊ. तिथे हीटर लावलेला असेलच. नाहीतर अंगीठी तरी असेलच. हा बघ, अजूनही थरथरतोय. गाल-कान- डोळे कसे लाल झालेत बघ याचे.'' आत्ता कुठे माझं माझ्या बाळाकडे नीट लक्ष गेलं. खरंच, तिथल्या मुलांसारखे लालबुंद झाले होते त्याचे गाल. तिथलाच वाटत होता तो. पण तिथला नव्हता ना तो! त्याला ती अचाट थंडी जराही सहन होत नव्हती. मी झपकन् माझ्या 'स्लेज-मोड' मधून, 'स्लेज-मूड' मधून बाहेर येत बसकडे धाव घेतली. हॉटेलमधे पोहोचलो. हीटर लावला. बाळाला कवटाळून बाबा हीटरच्या पुढ्यात जाऊन बसला. हळू-हळू बाळाच्या अंगात मुरलेली हुडहुडी शांत होत गेली. तो जरा-जरा भानावर आला. बाबाच्या डोक्यात भरलेला रागाचा थयथयाटही शांत होत गेला. तोही जरा- जरा ठिकाणावर आला. मी मात्र अजूनही त्या प्रसंगाची आठवण झाली की स्वत:शीच खजील होते. कुठे ती हिरकणी, जी गडाचा दरवाजा बंद झाला तेव्हा आपल्या बाळाकडे पोहोचण्यासाठी उंच बुरुजावरून दगड- गोट्यांतून ठेचकाळत धडपडत खाली आली आणि कुठे मी, जी आपल्या गारठलेल्या बाळाकडे दुर्लक्ष करून स्लेजवरून मजेत घसरत- घसरत खाली आले. माणसं शतकानुशतकं आईची महती गात आली आहेत. पण कोणी माझी महती गावी अशी आहे का मी? माणसं बाबाची महती गाताना फारशी दिसत नाहीत. पण आमच्याकडे बाबानेच बाळाला मायेची ऊब दिली; नि:स्वार्थाची डूब दिली. त्यावेळी त्यानेही स्लेजवरून घसरत येण्याचा आग्रह धरला असता तर? त्या दिवसानंतर इतक्या वर्षांत कोणीही मला त्या प्रसंगाची आठवण करून दिली नाही. बाबाने मनाचा मोठेपणा म्हणून आणि मुलाने, कदाचित त्याला आठवतही नसेल म्हणून. मला मात्र ते सगळं अगदी लख्ख आठवतं. काल परवा घडल्यासारखं. वाटतं, आई होतो आपण. मग असं कसं घडलं आपल्या हातून?

नंतर त्यागाचे अनेक प्रसंग आले. तेव्हा- तेव्हा त्याग घडलाही आपल्याकडून. पण म्हणतात ना, 'बूँदसे गयी वह हौदसे नहीं आती।'

मो.८७७९१९४०४२

## 'काशी- एक पुण्य नगरी, मराठ्यांचे कर्तृत्व व आजचा मराठी समाज'

-सतीशचंद्र कोठारे

भाग - २

''मराठ्यांचे कर्तृत्व''

त्या अगोदर, भाग-१ बद्दल थोडे काही...

भाग-१ वाचून कौतुकाचे असंख्य फोन व संदेश आले. अगदी सातासमुद्रापारहूनसुद्धा!

मा. श्रीनिवास देव, ज्यांनी प्रदोष काळात, विश्वेश्वराच्या देवळातील आम्ही केलेल्या लघुरूद्राचे (११ ब्राह्मणांकृत) प्रमुख पौरोहित्य केले होते, त्यांच्या मते आर्य हे बाहेरून नव्हते आले, ते येथीलच होते.

हीच बाब माझे बंधु डॉ. अल्हाद कोठारेंनीही माझ्याशी चर्चा करताना सांगितली की, आर्यांबाबत एक थिअरी असेही सांगते आहे.

देवांनी हेपण सांगितले की, 'भट्ट' ही उपाधी, वेद-शास्त्र सांगोपांग अभ्यासिलेल्या माणसांना दिली जात असे व गागाभट्ट हे 'भट्ट भट्ट' होते. ते तेव्हढेच युद्धनिपुण होते व तलवार बाळगायचे. काशीतील त्या काळच्या महान मराठी लोकांमधील ते एक प्रमुख होते, म्हणूनच शिवाजी महाराजांनी खास करून त्यांस आमंत्रित केले होते.

अशा अभिप्रायांनी माझा हुरूप वाढला, एवढे मात्र खरे.

आता मूळ विषयाकडे वळूया...

आजच्या काशीमधील मराठा साम्राज्याच्या पाऊलखुणा पाहून माझे कुतूहल चाळवले की, महाराष्ट्रापासून साधारण हजार मैल दूर वसलेल्या ह्या शहरात, मराठा सरदारांच्या (संदर्भ जातीवाचक नसून, त्या काळातील महाराष्ट्रीय झेंड्याखालील लढवय्ये असा समजावा) वसाहती, त्यासुद्धा दिमाखात व ऐश्वर्यात कशा काय थाटल्या गेल्या? तेसुद्धा, मुसलमानी राजवटीच्या ऐन दारात?

भले मोठे, सुंदर घाट व गढ्या, ह्यांच्या नावाने दिमाखदारपणे उभ्या आहेत. त्यांनी स्थापलेली मंदिरेही अगणित! हे कसे काय?

पुन्हा आपले माझे प्रश्न, मनकल्लोळ व अस्वस्थता सुरू.

स्थानिक मराठी बांधवांना, काही वयस्क जाणत्या उत्तर भारतीयांना, मराठी पुजाऱ्यांना भेटलो, चर्चा केली. मन शांत झालं. साहजिकच होतं, बरीच उत्तरे व माहिती मिळाली होती ना.

आजची काशी वसवण्यात मराठ्यांचा मोठा हातभार आहे.

कुतुब ऊद्दीन ऐबक ह्या महमद घोरीच्या सेनापतीपासून (सन ११९०) ते पार औरंगजेबापर्यंत (१७०७) शेकडोंनी वर्षे काशी ही पीडित होती. अनेक मंदिरे नष्ट केली गेली व परत उभारली गेली. दुष्टचक्र चालूच होते.

औरंगजेबाने त्याच्या हयातीत सर्वात जास्त मंदिरे पाडली. मराठ्यांचा नायनाट करायला तो २५ वर्षे महाराष्ट्रात राहिला व तेथल्याच मातीत संपला. परंतु ती २५ वर्षे तो दिल्लीत असता तर काशीत त्याने अजूनच कहर केला असता. (माझे असेही मत आहे की शिवाजी महाराज व मराठ्यांचा त्याच्यावर

(पान ४ कॉलम ३ वर)

काही नवे - काही जुने

# द्राक्षामृत

-नंदकुमार विजयकर

मध्यंतरी महाराष्ट्र सरकारने किराणा मालाच्या दुकानात वाईन विकण्याची परवानगी देण्याचा प्रस्ताव मांडला होता. त्यावरून बरीच उलटसुलट चर्चा सुरू झाली. तो प्रस्ताव स्वीकारून त्यांची अंमलबजावणी झाली की नाही याची काही कल्पना नाही. पण या गोष्टीने लोकांचे लक्ष वाईनने वेधून घेतलं.

'वाईन म्हणजे काय रे भाऊ?'

'अरे, ते एक लाल पेय असते.'

वाईनबद्दल आपली एवढीच माहिती आहे. चला तर मग वाईनबद्दलची सर्व माहिती जाणून घेऊया. सर्वसाधारणपणे द्राक्ष आणि इतर फळांपासून वाईन बनवण्यात येते. पण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, स्कॉटलंडमध्ये बनलेल्या व्हिस्कीलाच स्कॉच म्हणतात तसेच द्राक्षापासून बनणाऱ्या पेयालाच वाईन म्हणून ओळखले जाते. सर्वप्रथम वाईन बनवण्याची कृती जाणून घेऊया. यात पाच पायऱ्या आहेत.

१) सर्वप्रथम द्राक्षाच्या मळ्यातून द्राक्षे हाताने खुडली जातात.

२) द्राक्ष चिरडली जातात. पूर्वी पायाने तुडवून लगदा बनवला जाई. आता हे काम मशीनने केले जाते.

३) Fermentation - रस आंबवला जातो. रस गाळून, डिसटिलेशन होऊन अल्कोहोल प्रक्रिया पूर्ण झाल्यावर वाईन बनते.

४) Cask -लाकडी पिंपात २-३वर्षे ठेऊन मुरवली (Ageing) जाते.

५) बाटल्या भरून बाजारात विक्रीला पाठवली जाते.

आता वाईनचे प्रकार पाहूया. ढोबळमानाने आपण वाईनचे दोन प्रकार जाणतो. एक म्हणजे रेडवाईन आणि दुसरी व्हाईट वाईन. लालरंगाच्या द्राक्षापासून रेडवाईन बनते. तसे पहिले तर सर्वप्रकारच्या द्राक्षाचा गर साधारण सफेद रंगाचा असतो पण लालरंगाच्या सालीमुळे रेडवाईन मिळते तर; इतर द्राक्षामुळे व्हाईट वाईन होते. व्हाईट वाईनमध्ये मुख्य दोन प्रकार आहेत Cabernet आणि Sauviagnon. तर रेडवाईनमध्ये Merlot, Pinot Noir आणि Zinfandel. या व्यतिरिक्त व्हाईट वाईनचे दोन प्रकार आहेत. स्पार्कलिंग वाईन आणि Rose वाईन. लाल आणि सफेद द्राक्षाच्या मिश्रणातून फिकट गुलाबी रंगाची रोझ वाईन बनते. स्पार्कलिंग वाईनमध्ये $Co_2$ गॅस मिसळलेला असतो. प्याल्यात ओतल्यावर फसफसून वर येणारे बुडबुडे हे या वाईनचे वैशिष्ट्य. एक गोष्ट लक्षात घ्या. सर्व स्पार्कलिंग वाईन शांपेन नसतात तर फ्रांसमधील शांपेन या प्रांतात बनलेल्या वाईनलाच शांपेन म्हणून ओळखले जाते. वाईनची वेगवेगळी नावे त्या त्या द्राक्षाच्या जातीवरून देण्यात आली आहेत.ड्रायवाईन आणि स्वीट वाईन अशी ही एक वर्गवारी करण्यात येते. द्राक्षाच्या रसाची आंबवण्याची प्रक्रिया होताना त्यातील साखरेचे संपूर्ण विघटन होऊन अल्कोहोलमध्ये रूपांतर होते. त्यामुळे साखरेचा अंश पूर्णपणे नष्ट होतो. याला ड्रायवाईन म्हणतात. पण जेव्हा फरमेनटेशन प्रक्रिया अर्ध्यावरच थांबवली जाते तेव्हा वाईन गोड बनते. 'पोर्टवाईन' ही या प्रकारात मोडते. वाईनमध्ये अल्कोहोलचे प्रमाण ११ ते १३ टक्केपर्यन्त असते.

हे सर्व वाईनचे प्रकार आणि उत्पादन क्रिया जाणून घेतल्यानंतर यांचे नेमके उच्चार कसे असतात ते पाहूया. सर्वप्रथम वाईनच्या द्राक्षमळ्यांना (vineyard) विनयार्ड म्हणतात. वाईन जेथे बनते त्याला (vinery) वाईनरी म्हणतात. वाईन मुख्यत: युरोपमधील जर्मनी, इटली, स्पेन, फ्रांस या प्रदेशात होते. फ्रांसमधील Boardeaux आणि Burgundy या विभागात उच्च प्रतीची वाईन बनवली जाते. बहुतेक वाईनची नावे फ्रेंच, जर्मन, इटालियन भाषेत आहेत. आता Boardeauxचा उच्चार बोडो (baw – doh) असा होतो. Burgundy -बरगंडी. वेगवेगळ्या वाईनचे नेमके उच्चार जाणून घेऊया. Sauvignon - सोवीन्यॉन (soh – vuh – nyaun), Cabernet -कॅबिने (ka–buh–nay), Pinot Noir -पीनोनुआ (pee – noh – noo – aa), Chardonay - शाडूने (shaa–duh–nay), Zinfandel - झीनफंडेल (zin – funn – del), Merlot - मलो (muh – loh).

मित्रहो, वाईन पिण्याने शरीराला काही फायदा होतो का? वाईन शरीराला अपायकारक तर नाही ना? खिशाला परवडेल का? अनेकांच्या मनात हे प्रश्न असतील. वाईनची किंमत २०० रुपयापासून २००० आणि त्यावरही असू शकते.

वाईनमधील माफक मात्रेत असलेल्या अल्कोहोलमुळे भूक प्रज्वलित होऊन अन्नपचनास मदत होते. द्राक्षाच्या सालीत रूजवेट्रॉल (Resvertrol) नावाचे द्रव्य असते ते अँटीऑक्सिडेंट म्हणून काम करते. रक्तवाहिन्या मोकळ्या करून हृदयाचे काम सुकर होते. अर्थात अल्कोहोलचे अतिसेवन केव्हाही वाईट.तज्ज्ञलोक नेहमीच सल्ला देतात. Drink responsibly. मग व्हिस्की, रमसारखे हार्डस्पिरीट असो की वाईन असो; प्रमाणात घ्या. खुश रहा.

मो. ९८१९६ २८७६५

✳

(पान ३ कॉलम ४ वरून)

वचकही होता तो असा की मंदिरांबाबत अजून काही आगळीक अंगलटी यायची व समस्त हिंदू समाज एका झेंड्याखाली येऊन दिल्ली हातची जायची).

१८व्या शतकात मराठा हे ताकदवर साम्राज्य स्वरूपात भारतभर पसरले व काशी नगरीचे नशीब पालटले.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर बाळाजी विश्वनाथ पेशवे जातीने वाराणसीला आले व त्यांनी काशीची विपन्न अवस्था पाहिली.

बाळाजी विश्वनाथनी पेशव्यांच्या आज्ञेनुसार तेथील घाटाचे पुन:निर्माण कार्य सुरू झाले. पेशव्यांच्या पाठोपाठ नागपूरकर भोसलेंनी (हे माझ्यामते, पेशव्यांएवढेच सामर्थशाली व कर्तबगार; पण दुर्लक्षित सरदार होते. कधी जमले तर त्यांच्या कर्तृत्वाबद्दल अभ्यासपूर्व लेख लिहायचा मानस आहे) भोसले घाट, शिंदेंनी शिंदे घाट, अहिल्याबाई होळकरांनी होळकर घाट, अहिल्या घाट तसेच मनकर्णिका घाटाचे नूतनीकरण ह्या गोष्टी आरंभिल्या. (मनकर्णिका तांबे म्हणजेच प्रख्यात 'राणी लक्ष्मीबाई', ह्यापण काशीच्याच बरं का). काशीला त्याचे जुने रूप व ख्याती प्राप्त करून देण्यास वरील गोष्टींनी बळ आले.

असंख्य धर्मशाळा व मंदिरे ह्या लोकांना उभारली. 'काशी प्रदक्षिणा पंचक्रोशी' यात्रेतील महत्त्वपूर्ण पांची मुक्कामावर यात्रेकरूंच्या मुक्कामासाठी पेशवे व तत्कालीन सामर्थ्यवान महाराष्ट्रीय लोकांनी बांधलेले भक्कम मोठाले वाडे आजही त्यांची साक्ष देत सुस्थितीत आपले गतवैभव दर्शवत उभे आहेत.

अहिल्याबाईंनी जातीने लक्ष देवून काशी-विश्वेश्वराचे मंदिर, जे औरंगजेबाने पाडले होते ते उभे केले.

'कालभैरव' हा काशीचा कोतवाल आहे असे स्थानिकांनी आम्हाला सांगितले. असेही समजले की मंदिराच्या हद्दीतील कोतवाली पोलीस स्टेशनमधील कोतवाल हा त्याच्या खुर्चीत बसत नाही तर कालभैरवाचा फोटो ठेवतो! तर ह्या मंदिराचा जिर्णोद्धार केला होता 'दुसऱ्या बाजीरावाने'!

मला, तेथील वास्तव्यात, बाजीराव पेशव्यांनी उभारलेले दत्तात्रयाचे मंदिर बघण्याचा योग आला.

तसेच मराठा सरदारांनी बांधलेले साक्षिविनायक मंदिर, अन्नपूर्णा मंदिरही बघायला मिळाले.

रघुनाथराव पेशव्यांची गढी व त्यांचे पुत्र अमृतराव पेशव्यांनी बांधलेले अन्नपूर्णा देवीचे मंदिर छानच आहे.

ती संपूर्ण गढी व आत्ताचे पेशव्यांचे वंशज अधूनमधून काशीला येतात तेव्हा जेथे रहातात ती खोली पहायचे भाग्य लाभले.

त्याबरोबरच सरखेल कान्होजी आंग्रे, नाना फडणवीस, सांगलीकर पटवर्धन (ह्यांच्या गढीत चहापानाचा योग आला), पाटणकर यांच्या गढ्यापण पहायला मिळाल्या.

बिंदु-माधवाचे, औंधच्या संस्थानिकानी बांधलेले मंदिरपण सुंदर आहे. बिंदुमाधव हे काशीचे प्रधान दैवत होय व विश्वेवरानंतर काशीत मान हा बिंदुमाधव यांचा!!

मराठ्यांचे फार मोठे योगदान होते ते त्यांनी परत सुरू केलेल्या धार्मिक यात्रा व त्याला केलेली आर्थिक मदत व संरक्षण! त्याकाळी जबरदस्त कर लादले जायचे तीर्थयात्रेवर, हे कर मराठ्यांनी रद्द करवले.

महंमद खान बंगशाचा पाडाव केल्यावर, दोनच वर्षात, बाजीराव पेशव्यांच्या आई, राधाबाईंनी मोठी यात्रा आरंभली. त्यात त्या काशी, प्रयाग व गयालापण आल्या. त्या यात्रेत, बंगशाचे हजार शिपाई त्यांच्या तैनातीत होते. असे म्हणतात की यात्रेबरोबरच मराठा ताकद दाखविणे हा एक उद्देश होता महान बाजीरावांचा.

मराठी माणूस काशीला गेल्यावर काशीतील मराठ्यांचे ऐश्वर्य, त्यांच्या वास्तू वगैरे पाहण्याच्या विशेष फंदात पडत नाही. आपली मराठी नावे असलेले दोनचार घाट बघितले की आपला ऊर अभिमानाने भरून येतो व मराठी अहं सुखावतो, एवढंच. त्यांनी बांधलेल्या गढ्या पहाणे, मंदिरे पहाणे हे आपल्या ध्यानीमनीपण नसते. किंबहुना या प्रचंड कार्याबद्दल आपल्याला फार कमीच माहिती आहे.

विषय मजेदार वाटला व खास करून मित्र संतोष पाचलगांच्या आग्रहाने काशीतील मराठी वारसा पहावयास मिळाला तो आपणापर्यंत पोहचवावा म्हणून हा विशेष खटाटोप.

काशीमधील मराठी समृद्धी आपल्या लोकांना कळावी, त्यांनी ती आवर्जून पहावी त्यासाठी अजून काय करता येईल हा विचार आता माझ्या मेंदुचा भुगा करतोय.

(समाप्त)

मो. ९८२०८४८४५६

✳

## Commissioner Meyers appointee Swapan Dhairyawan to join Toll Road Authority Board of Directors



Fort Bend County, Texas - Commissioners Court has approved Precinct 3 Commissioner Andy Meyers' appointment of Swapan Dhairyawan to the Board of Directors of the Fort Bend Toll Road Authority and the Grand Parkway Toll Road Authority.

Dhairyawan succeeds Dean Hrbacek on the Grand Parkway Toll Road Authority Board of Directors. Hrbacek was recently elected Judge of County Court at Law 6.

Dhairyawan is a Certified Public Account (CPA) with more than 26 years of private and public experience. He earned bachelor's and master's degrees in advanced accounting from Bombay University. He also holds a professional cost and management accountants' degree.

The India Culture Center of Houston honored Dhairyawan with a Lifetime Achievement award in August 2022. He is also a member of the Indo American Chamber of Commerce of Greater Houston, and the recipient of several community service awards for his service to non-profit associations, including the Foundation for India Studies, the Hindus of Greater Houston, the International Hindi Association, the Indian Muslims Association for Greater Houston, Indo-American Conservatives of Texas, and Society of Indo-American Arts.

"I am proud to appoint Swapan Dhairyawan to the Grand Parkway Tollway Board of Directors," said Precinct 3 Commissioner Andy Meyers. "He is a Certified Public Accountant and understands the importance of being a good steward of the people's money. In addition, I want to thank Dean Hrbacek for his invaluable service on the board and congratulate him for being elected Judge of County Court at Law 6 by the citizens of Fort Bend County. I am sure we will all benefit from his service."

#andymeyers India Culture Center, Houston Fort Bend Today Indo American Chamber of Commerce Indo American Chamber Of Commerce of Greater Houston Foundation for South Indian Studies Hindus of Greater Houston HGH Young Hindus of Greater Houston Indo-American Conservatives of Texas I-ACT #hounews #fortbendcounty #fortbend #FortBendCountyTX

Congratulation.

## अभिनंदन

✶ प्रीडिक्टीव्ह होमियोपाथीत स्वत:ची नाममुद्रा उमटविणारे डॉ. अंबरीष विजयकर यांना त्यांच्या कार्याबद्दल 'पुढारी' वर्तमानपत्राच्या नामांकन २०२३, सोहळ्यात गौरविण्यात आले. प्रीडिक्टीव्ह होमियोपाथीचे ते 'मॅनेजिंग डायरेक्टर' आहेत. होमियोपाथीचे संस्थापक डॉ. हनिमान आणि डॉ. प्रफुल्ल विजयकर यांच्या आशीर्वादाने अंबरीष यांनी होमियोपाथीचे कार्य सातत्याने चालविले आहे. अभिनंदन.

✶ कु. चैतन्या नितीश कीर्तिकर हिने नेहरू सायन्स सेंटरमधील 'आस्ट्रो पोएट्री' स्पर्धेत वांद्रे येथील आर्य विद्यामंदिर शाळेचे प्रतिनिधीत्व केले आणि ती स्पर्धेत पहिली आली.

✳

## BOX CRICKET TOURNAMENT 2023

The Pathare Prabhu Social Samaj's Box-Cricket Tournament was held on sunday the 22nd Jan 2023 near milan sub-way, santacruz (w.) from 8 a.m. onwards, The national Anthem was played at the begining of the Event, after which Jt. Sec. Mr. Jayant Kirtikar requested everyone to deserve 2 minutes silence in memory of ex-escretary late Mr. Amber Mahadev Kothare.

Vice-President Mr. Tushar Kirtikar inaugurated the tournament by the Toss of the coin for the first match. In all 10 Teams comprising of 80 players participated, including 2 ladies/ girls teams. The seniormost player was 76 year old Subhash Desai for whom late Vandana Nawalkar had sponsored a Trophy.

The ladies/girls team winners was captaind by Pranoti Kirtikar which included Myra Rane, Kimaya Kothare, Aslesha Kirtikar, Dipali Talpade, Manali Jayakar, Ameeta Kirtikar and Shamina Jayakar.

Bhoopali Senjit's Team were Runners-up which included sisters shipra and Trisha and mother Sonali Kothare, Aditi Talpade, Neelam Kothare, Pallavi Kothare and Salomi Senjit. The best batter's Trophy was won by Manali Jayakar.

The men's tournament was won by team B, captaind by Paraj Dhurandhar, which included Subhash Desai, Abhijit Talpade, Mehul Kothare, Ashish Desai, Amit Rane, Jeet Jayakar, Sanman Dhurandhar.

The runners up were team captained by Raaj kirtikar which included Ashwin Talpade, Tushar Kirtikar, Anirudh Kirtikar, Satej Rane, Ashish Gorakshakar, Swapnil Desai and Yash Agaskar.

The best batters Trophy was won by Asit Talpade. The best bowler was Mehul Kothare & Ashish Desai was the best fielder.

The prize for the most number of sixers sponsored by Mrs. Swarangi Smitchandra Nawalkar was won by Raaj Kirtikar Mr. Shashank Kothare. Sponsored a best over of the tournament prize which was won by Prathamesh Mehul Kothare.

Mr. Omkar Gurav Ex-mumbai ranji trophy and duleep trophy player was the chief guest of the tournament. Mr. Jayant Kirtikar while introducing him read out his long list of achievements as a player and as a coach. Mr. Jwala Singh, another player and coach was also present.

Mr. Jayant Kirtikar informed the chief guest that P. P. community is a cricket loving community, and that way back in 1930-40s late Dinkar sunderrao talpade was selected to play test cricket after having played Ranji Trophy, for Bombay under the captiancy of Vijay Merchant, and later Samir Talpade won a contempory of Sachin Tendulkar in the mumbai ranji trophy team.

Smt. Swati Rane, president felicitated both the chief guest with bouquets and sweets, and then they were requested to say a few words of advice to the youngsters.

Mr. Omkar Gurav said that cricket is a game of passion also it gives recreation too. Mr. Jwala Singh said that he was happy to see so many people playing and congratulated all of them.

in his note of thanks address, Jt. sec Jayant Kirtikar thanked the following donors and sponsers of the tournaments.

1) Smt Swaranjali & Shri Smitchandra Shrinath Navalkar, 2) The executor of the estate of late Mrs. Premlata K. Rane, 3) Late Smt. Vandana Pramod Navalkar 4) Master Ishan Amit Talpade 5) Mr. Abhay Purushottam Kirtikar, 6) Mr. Kiran Ramchandra Talpade, 7) Mr. Arman Akshay Kothare, 8) Mr. Sudhakar Shetty, 9) Mrs Neelan & Mr Deepak M. Dhairyawan, 10) Mr. Bansidhar S. Dhurandhar, 11) Mr. Shashank K. Kothare.

Mr. Yadnesh Vijay Dhurandhar sponsored the tennis ball's in memory of his mother late neha Vijay Dhurandhar. He also thanked Rashmin Rane for all the assistance to the organising commitee. He thanked Rahul Agaskar for the artwork on the banners and Anirudh Kirtikar for the score board and all other boards.

Jayant Kirtikar also thanked P.P. mahila samaj for the use of their portable speaker and wate dispenser. He thanked Sudhir Dhurandhar for the catering service and Raju Talpade for using his good offices to provide official MCA umpires and score.

He thanked the organising commitee which included Viju Dhurandhar, Anirudh Kirtikar, Abhijeet Vijayakar and Shilpa Dhurandhar and himself Jayant Kirtikar, Mr. Tushar Kirtikar clicked photos on his camera. In the end he thanked the spectators for turning out in large number to cheer their near and dear ones.

All players and spectators were given breakfast, lunch and tea by P. P. Social Samaj. Afterwords the award function was held. A notable feature of the tournament was that 3 members of a Dhurandhar family had come all the way from Ahmedabad to play in the tournament.

By : **Jayant Kirtikar**

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

०२-०३-२३ सौ. यशदा आणि श्री अक्षय राजेंद्र तळपदे, कन्या, ऑस्ट्रेलिया

### आत्याबाई नाव बोला

कु. ओबी अक्षय तळपदे
कु. सानवी (वाणी) अमित धैर्यवान, ठाणे

### नांदा सौख्यभरे

१४-०२-२३ कु. सुखदा सनतकुमार राणे श्री. सिद्धेश्वर महापात्रा (आं.ज्ञा.)

### विवाह सुवर्ण महोत्सव

१७-०२-२३ कु. रश्मी चंद्रकांत राणे श्री. अरविंद केशवराव कोठारे

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०२-०२-२३ | श्री मनोहर सुंदरराव राव, | वय ९१, | कांदिवली |
| १४-०२-२३ | श्री. जयदीप सुभाष धराधर, | वय ५३, | अंधेरी (प.) |
| १६-०२-२३ | श्री. सुभाष वामनराव विजयकर, | वय ७४, | सांताक्रूझ |
| १६-०२-२३ | श्रीमती उल्का सुरेश विजयकर, | वय ८२, | सांताक्रूझ (पूर्व) |
| २२-०२-२३ | मेधा विठोबा नायक, | वय ७९ , | बोरीवली |

## अभिनंदन

∗ दि. १६ फेब्रुवारीला पुण्याच्या फिल्म इंस्टिट्यूट ऑफ इंडियात श्री. सुजन राणे यांनी काढलेल्या दादासाहेब फाळके यांच्या तैलचित्राचे समारंभपूर्वक अनावरण झाले. हे तैलचित्र सुजन राणेंनी सप्रेम भेट दिले आहे.

∗ दिनांक ४ ते ११ फेब्रुवारी दरम्यान काळा घोडा फेस्टिवल झाले. या काळा घोडा असोसिएशनच्या कार्यकारिणीत सॉलि. राजन जयकर आहेत. ताज हॉटेलमध्ये झालेल्या पहिल्या सत्राचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्यांच्यासवे श्री. कुणाल विजयकर, श्री व सौ. बॉबी विजयकर हे सन्माननीय म्हणून उपस्थित होते. काळा घोडा प्रदर्शनाचेही उद्घाटन सॉलि. राजन जयकर यांच्या हस्ते झाले. त्याचप्रमाणे विंटेज कार रॅलीत पारंपारिक पोशाख स्पर्धेत श्री. राजन, सौ. केतकी आणि त्यांचे दोन नातू त्यांच्या विंटेजकारसह सहभागी झाले आणि त्यांना प्रथम पारितोषिक लाभले.

∗ प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांचे ‘शरच्चंद्र मुक्तिबोध - शतकोत्तर आकलन’ आणि ‘टिपंवणी-झरा मूळच्या खरा’ या दोन पुस्तकांत लेख प्रसिद्ध झाले.

∗ दिनांक २२/२/२३च्या महाराष्ट्र टाइम्समध्ये श्री अरविंद धराधर यांचा ’माझे पहिले घर ’हा लेख प्रसिद्ध झाला.

∗ दिनांक २५/२/२३रोजी मैत्री संस्थेतर्फे ’चाकोरीबाहेरील चारचौघी ’हा उपक्रम सादर झाला. या कार्यक्रमात पॉप्युलर प्रकाशनातील पाच दशकांच्या पब्लिशर्स एडिटर म्हणून केलेल्या कामावर मृदुला प्रभुराम जोशी यांचे व्याख्यान झाले.

∗ पार्ले टिळक विद्यालय मराठी शाळेच्या १९७५ च्या बॅचचे माजी विद्यार्थी प्रोफेसर निखिल धुरंधर यांना पॉल व्हिटफिल्ड हॉर्न डिस्टींग्विश्ड प्रोफेसरशिप प्रदान करण्यात आली आहे. शिक्षण क्षेत्रातला हा अतिशय प्रतिष्ठेचा सन्मान आहे.

प्रोफेसर निखिल धुरंधर यांना टेक्सास टेक युनिव्हर्सिटीमध्ये फॅकल्टी सदस्याला मिळू शकणाऱ्या सर्वोच्च सन्मानाने गौरवण्यात आले असून , त्यांना टेक्सास टेक सिस्टम बोर्ड ऑफ रीजेंट्सने एकमताने ‘‘हॉर्न प्रोफेसर’’ म्हणून मान्यता दिली आहे.

प्रोफेसर निखिल धुरंधर, यांनी रसायनशास्त्रात पदवी, पोषण आणि अन्न विज्ञानात पदव्युत्तर पदवी आणि पोषण आणि नैदानिक न्युट्रिशनमध्ये पोस्टडॉक्टरल पदवी मिळवली असून , २०१४ मध्ये ते न्यूट्रिशनल सायन्सेस विभागाचे अध्यक्षपदी रुजू झाले होते . धुरंधर यांनी त्यांच्या कार्यकाळात भारतात लठ्ठपणा व्यवस्थापनविषयक तीन कार्यक्रम आणि युनायटेड स्टेट्समध्ये आणखी तीन कार्यक्रम राबवले आहेत.

प्रोफेसर निखिल धुरंधर यांनी आतापर्यंत १७५ लेख//शोधनिबंध लिहिले आहेत . प्रोफेसर निखिल धुरंधर यांचे पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या हातून या क्षेत्रात यापुढेही भरीव कामगिरी घडो. पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

## पाठारे प्रभू महिला समाज

पाठारे प्रभू महिला समाजातर्फे रविवारी ५ फेब्रुवारी २०२३ रोजी खारच्या पाठारे प्रभू को-ऑपरेटीव हाऊसिंग सोसायटी सांस्कृतिक केन्द्राच्या सभागृहाच्या तळमजल्यावर भव्य आनंदमेळावा भरविण्यात आला होता.

या भव्य आनंद मेळाव्याचे उद्घाटन सौ. रंजना सतीश धराधर यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. समाजाच्या चिटणीस पल्लवी कोठारे यांनी सर्व उपस्थितांचे प्रास्ताविक करून स्वागत केले व अध्यक्षा साया नवलकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली तसेच त्यांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले आपल्या भाषणात त्यांनी सांगितले कि जर आपल्याला घरच्यांकडून सहकार्य मिळाले तर घरून केलेला व्यवसाय खुप मोठा होतो. तळमजल्यावर एकंदरीत ६१ स्टॉल होते.

त्यानंतर सौ. रंजना ताई यांनी सर्व स्टॉलना भेट देऊन स्टॉलधारकांचे कौतुक केले. त्यांच्या हस्ते लकी ड्रॉ काढण्यात आले व तीन स्टॉल धारकांना भेटवस्तू दिल्या.

सौ. रंजनाताई ह्यांनी आपल्या मातोश्री कै. उषा रवींद्र देसाई यांच्या स्मरणार्थ रुपये ५०००/- समाजाला दिले. या आनंद मेळाव्याला जातीतील व बाहेरील बंधू भगिनींनी उत्साहाने हजेरी लावली.

## भव्य चित्रकला प्रदर्शन

दिनांक १३आणि १४मे २०२३ या दोन दिवशी खार येथील पाठारे प्रभू सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात सकाळी ११ते२आणि सायंकाळी ४ते ७या वेळात नीला त्रिलोकेकर यांनी तुमच्या सहकार्याने भव्य चित्रकला प्रदर्शन आयोजित केले आहे. तेव्हा सर्व पाठारे प्रभू चित्रकार बंधूभगिनी आणि लहान मुले यांनी आपली स्वचित्रीत रंगचित्रे (एक किंवा दोन) नीला त्रिलोकेकर (मोबाईल - ९३७१०२६०४०)किंवा गीता आंबवणे (मोबाईल - ९८२३७३८३६०)यांजजवळ दिनांक ३०एप्रिल २०२३पर्यंत आणून द्यावीत. (चित्रावर स्वत:चे नाव आणि वय नमूद केलेले असावे.) उपक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य अपेक्षित आहे.

## परीक्षेतील सुयश

**बीएससी (पीसीएम) स्वामी विवेकानंद भारती विद्यापीठ यू.पी.**

श्री युग परेश कोठारे ५१२/८००, ‘ए’ ग्रेड

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67